सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात बस आणि आयशर मध्ये समोरासमोर अपघात

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि 15 | फर्दापूर . छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात बस आणि आयशर ट्रक यांचा समोरासमोर अपघात बुधवारी सकाळी साडे सहा वाजता जळगाव बारामती एम एच 14 एम एच 8612 आयशर ट्रक चाकण हुन जळगाव जाणारा एम एच 42 टि 7304 यांचा सकाळी साडे सहा वाजता अजिंठा घाटात वळणावर समोरासमोर अपघात झाला असून यात काही जण किरकोळ जखमी झाले परंतु या अपघातामुळे अजिंठा घाटात ट्राफीक जाम होण्यास सुरुवात झाली तरी फर्दापूर पोलीस स्टेशन मध्ये माहिती मिळताच पोलिस कर्मचारी फिरोज तडवी जगतगुरु नरेंद्राचार्य महाराज

संस्थान चे चालक केदार पवार हे घटनास्थळी धाव घेतली आणि आयशर बस बाजूला करण्यात आली परंतु तोपर्यंत वेळ जास्त झाला असल्याने छोट्या मोठ्या गाड्या आणि अवजड वाहने यांच्या लांबच लांब रांगा लागल्या असल्याने सर्व ट्राफिक हळूहळू काढण्यासाठी अकरा वाजले होते.

यामध्ये जगप्रसिद्ध अजिंठा लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची मोठ्या प्रमाणात धांदल उडाली होती कारण की काही जणांचे परतीचा प्रवास विमानाचा असल्याने वेळेवर लेणी पाहून वेळेवर जाण्याची घाई असते परंतु अजिंठा घाटात अपघात झाला की पर्यटकांसमोर मोठा प्रश्न चिन्ह उभा रहातो तसेच सध्या लग्न सुरू असल्याने वऱ्हाड अटकले होते तसेच विद्यार्थी प्रवासी यांचे मोठे धांदल उडाली होती तरी या अपघातातील आयशर ट्रक चालक यावर फर्दापूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे एप्रिल महिन्यात हि सातवी घटना अजिंठा झाली असुन सुद्धा या घाटातील अपघात कडे ना शासनाचे लक्ष ना प्रशासनाचे लक्ष फक्त आहे ते दुर्लक्ष यामुळे या घाटातून जाण्यासाठी बरेच जण विचारतात की घाटा सुरू आहे का बंद आहे कारण या घाटात अटकले पाच ते सहा तास लागतात त्यामुळे काही जण पर्यायी मार्गाने निघून जातात

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सहात साजरी

पैठण दि १५ :- भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्य बसस्थानक परिसरातील महामानव स्मारक येथे त्यांच्या पूर्णकृती पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.यावेळी आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी समाज बांधवांना जयंती उत्सवाची शुभेच्छा देत यंदा लोकप्रिय कार्यक्रम घेतल्या बद्दल जयंती उत्सव समितीची प्रशंसा केली. सकाळी तसेच सायंकाळी पॉवर ते स्मारक अशी भव्य अभिवादन रॅली व मिरवणूक काढण्यात आली ज्यात हजारो समाज बांधवांनी सहभाग घेत जय भीम नामाचा गगनभेदी जायघोष केला.

याप्रसंगी आमदार विलास बाप्पू भुमरे,दत्ता गोर्डे,नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसणकर, उपनगराध्यक्ष तुषार पाटील,मुख्याधिकारी पल्लवी अंभोरे, गटविकास अधिकारी मानोरमा गायकवाड,,शिवाजी नागरी बँकेचे चेअरमन रवींद्र काळे, सुरज लोळगे,पोलीस निरीक्षक महादेव गोमारे,माजी नगराध्यक्ष राजू गायकवाड, जितसिंग करकोटक, उत्सव समितीचे अध्यक्ष किरण घाटविसावे, नगरसेविका मनीषा साळवे,जालिंदर अडसूल, शेखर शिंदे, सुनील रासणे,गोवर्धन टाक,शिवराज परिक, लालू वीर,बजरंग लिंबोरे, कृष्णा मापारी,भाऊ वरकड स्वप्नील साळवे,सुमित मगरे, खुशालराव भवरे,अरुण काळे,महेंद्र साळवे, आबासाहेब गिरगे,अमोल जाधव,संदीप मडके, अनिकेत धारकर,पत्रकार रमेश लिंबोरे,गौतम बनकर, मदन अव्हाड, मंगलसिंग भवरे,राहुल पगारे,महेंद्र राजगुरु,संभाजी पगारे, महादेव बटूळे, शहराध्यक्ष सोमनाथ निकाळजे, गणेश पवार,बबलू बागवान,विनोद मगरे आदींसह हजारो समाज बांधव उपस्थित होते. सायंकाळी शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने भडकल गेट येथे बाबासाहेबांना अभिवादन

छत्रपती संभाजीनगर | भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भाजपच्या वतीने भडकल गेट येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी "जय भीम" च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. या अभिवादन सोहळ्याला कॅबिनेट मंत्री अतुल सावे, माजी केंद्रीय राज्यमंत्री खा. डॉ. भागवत कराड, भाजप जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, महापौर समीर राजूरकर, सभापती अनिल मकरिये, माजी महापौर बापू घडामोडे, पृथ्वीराजभाऊ पवार, नगरसेवक जालिंदर शेंडगे, नगरसेवक रामेश्वर भादवे, नगरसेविका माधुरीताई आदवंत, नगरसेविका कीर्ती शिंदे, छायाताई खाजेकर, नगरसेविका अर्चनाताई नीलकंठ, प्रदीप बुरांडे, नगरसेवक किशोर मानकापे, नगरसेवक राजगौरव वानखेडे, नगरसेवक सुरेंद्र कुलकर्णी, नगरसेवक नंदू गवळी, शंकर म्हात्रे, सचिन मिसाळ यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बिडकीन पोलीस ठाण्यामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

बिडकीन दि १५ एप्रिल बिडकीन पोलीस ठाण्यात महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ व्या जयंती उत्साहात साजरी करण्यात आली, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, यावेळी पोलीस उपनिरीक्षक संभाजी झिंजुर्डे, सहायक फौजदार अशोक सोकटकर, योगेश नाडे,मगर, संदीप धनेधर, सचिन आगलावे, एस एस कदम,आदी पोलीस कर्मचारी यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले,

स्वामी भागवत नंदगिरी जी महाराज श्री 1008 यांच्या पुण्यतिथीनिमित्त वेरूळ येथे शिव महापुराण कथा महोत्सव स जगद्गुरु स्वामी 1008 शांतिगिरी जी महाराज यांची भेट

तभा वृत्तसेवा

खुलताबाद दि १५ एप्रिल श्री क्षेत्र वेरूळ येथे स्वामी भागवत नंदगिरी जी महाराज श्री १००८ महामंडलेश्वर यांच्या पुण्यतिथीनिमित्त. उत्तराधिकारी अभय नंद गिरीजी महाराज मठपती कैलास आश्रम वेरूळ यांच्या मार्गदर्शनाखाली. दि १० एप्रिल ते १७ एप्रिल पर्यंत. परमपूज्य गोवछल्य.. गोवछल्य. श्री राधाकृष्ण स्वामी जी जोधपुर राजस्थान यांच्या मुखातून होत असून या कथेसाठी राज्यभरातून हजारो भाविकांची उपस्थिती संपन्न होत आहे

जगद्गुरु जनार्दन स्वामी यांचे उत्तर अधिकारी स्वामी१००८ महामंडलेश्वर शांतिगिरी जी महाराज श्री क्षेत्र वेरूळ यांच्या भव्य दिव्य संस्कार भवन मध्ये ही कथा होत आहे. दि १४ एप्रिल रोजी जगद्गुरु जनार्दन स्वामी आश्रमाचे उत्तर अधिकारी जगद्गुरु .१००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी जी महाराज यांची या कथेसाठी व्यासपीठावर प्रमुख्याने उपस्थिती होती . बाबाजींचे संत पूजन कथा आयोजक कैलास आश्रमाचे मठपती

स्वामी अभयानंद गिरीजी महाराज यांनी केले. यावेळी १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज यांच्यावतीने स्वामी विवेकानंद जी महाराज यांनी या भव्य दिव्य कथेच्या आयोजनाबाबत अभयानंद गिरीजी महाराज यांचे बाबाजी परिवाराच्या वतीने विशेष अभिनंदन केले. कथावाचक यांना मराठीतून विठ्ठल माझा विठ्ठल माझा भक्ती गीत गाणे सांगितले या गीतावर आलेल्या हजारो भाविकांनी पावली चा ठेका धरून जय बाबाजी चा जयजयकार केला.

(भागवत नंदगिरी जी महाराज १००८ यांची पुढील पुण्यतिथी ही त्रंबकेश्वरच्या महा कुंभ मेळाव्यात करावी अशी इच्छा व्यक्त करून जगद्गुरु महामंडलेश्वर १००८ स्वामी शांतिगिरी जी महाराज यांनी अभयानंद गिरीजी महाराज यांच्याकडे व्यक्त केले व त्यासाठी लागणारी जागा त्र्यंबकेश्वर येथील जनार्दन स्वामी यांच्या भव्य दिव्य आश्रमात उपलब्ध करून देणारा असल्याचीही जाहीर केले त्यानंतर अभयानंद गिरीजी महाराज यांनी आपल्या आदेश व सूचनेप्रमाणे पुढील पुण्यतिथी त्रंबकेश्वर कुंभ मेळाव्यात केल्या जाईल अशी जाहीर केले भक्तांच्या टाळ्यांच्या गजरात महाराजांच्या घोषणेचे स्वागत केले). याप्रसंगी महाराष्ट्रातील अनेक संत महंत यांची उपस्थिती होती. या कथेसाठी येणाऱ्या भाविकांसाठी अन्नदान मोठ्या प्रमाणात होत असून भाविकांसाठी सर्व सुख सुविधा भक्ता मंडळाकडून व्यवस्था करण्यात येत आहे

श्री स्वामी राधाकृष्णजी महाराज यांनी सोमवारी रोजी कैलास लेणी घृष्णेश्वर मंदिर या ठिकाणी भेटी देऊन समाधान व्यक्त केले कैलास शिल्प हे साक्षात महादेव या ठिकाणी स्वयंभू असल्यासार के मनाला वाटले कथे दरम्यान भक्तांनी आपले आचार विचार शुद्ध ठेवून भक्ती करा शेतकऱ्यांनी गावरान गाईचे पालन करून शेतीचे उत्पन्न वाढवा गो सेवा करा असे म्हटले या कथेसाठी आ प्रशांत बंब यांच्या वतीने भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे यांनी महाराजांचे स्वागत केले व आलेल्या सर्व संत महानतांचे. मान्यवरांचे कैलास आश्रमाच वतीने मठपती स्वामी अभयानंद गिरीजी महाराज यांनी सर्वांचे आभार मानले. हरिभक्त पारायण गोकुळ महाराज वाकळे भडजीकर यांनी या कथेसाठी भाविक भक्तांनी मदत करा असे आवाहन केले

भगवती विद्यालय बिडकीन येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १५ एप्रिल | पैठण तालुक्यातील बिडकीन येथील भगवती विद्यालय, बिडकीन येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ व्या जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेचे मुख्याध्या्पक रायभान रक्ते यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी रवींद्र गायकवाड,साळवे बाबासाहेबांच्या जीवनावर भगवान देहाडराय, दिगंबर सर्जे यांनी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी शाळेच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे त्रसंचालन कमलाकर यांनी केले तर आभार रामनाथ धनवे सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील पवार, श्रीधर जऱ्हाड, सुभाष राठोड, अप्पासाहेब किसवे, विश्रांती सलगरे, बंडू दुबे, आशुतोष झारगड यांनी सहकार्य केले.

मेडिकव्हर हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथे डॉ. प्रणव वंजारी यांच्याकडून गॅस्ट्रिक व्हेरिसेसवर यशस्वी उपचार

छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र – मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये कन्सल्टंट इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजिस्ट डॉ. प्रणव वंजारी यांनी गॅस्ट्रिक व्हेरिसेस या गंभीर आजारावर यशस्वीपणे अत्याधुनिक उपचार केले आहेत.

गॅस्ट्रिक व्हेरिसेस ही पोर्टल हायपरटेन्शनमुळे उद्भवणारी एक गंभीर अवस्था असून यामध्ये पोटातील रक्तवाहिन्या फुगतात आणि फुटल्यास जीवघेणा रक्तस्राव होऊ शकतो. अशा परिस्थितीत डॉ. वंजारी यांनी अत्याधुनिक, मिनिमली इनव्हेसिव्ह इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी तंत्रज्ञानाचा वापर करून अचूक आणि प्रभावी उपचार केले.

38 वर्षीय परभणी येथील एक तरुण यकृताच्या आजारपणामुळे बऱ्याच दिवसापासून ग्रस्त होता, परभणी येथे दाखवले असता त्यांना हैदराबाद किंवा मुंबई येथे जाण्याचा सल्ला देण्यात आला. नातेवाईकांच्या ओळखीने ते मेडिकवर हॉस्पिटल संभाजीनगर येथे पोहोचले .संपूर्ण तपासणी अंती त्यांच्या पोटात अतिरक्तस्त्राव झाला आहे हे डॉक्टरांच्या लक्षात आले .त्यांच्यावर पार्टो आणि कार्टो ही हायब्रीड प्रोसिजर सुईच्या साह्याने करण्यात आली. या शास्त्रक्रियेमध्ये कॉइल पण वापरण्यात आली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

सोयगाव,दि.१५ एप्रिल | येथील कै.बाबुरावजी काळे स्कूल येथे महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक प्रा.निलेश पाटील,व ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे प्राध्यापक डॉ. दादासाहेब पवार यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी ज्ञानेश्वर एलिस,योगेश काळे,सागर घाटे, मनिषा पाटील,रुपाली मानकर,जयश्री श्रीवास्तव,विद्या पाटील,आशा गणगे,उषा ढेपले,अरुणाभोई,नलिनी पाटील, रंजना जाधव,ज्ञानेश्वर पंडित,रमेश कंडारे,सुनीता जाधव, लताबाई गायकवाड आदी उपस्थित होते.

देशव्यापी मोहिमेद्वारे एलपीजी गॅसचा पुरवठा आता सुरक्षित

छत्रपती संभाजीनगर - एलपीजीचा साठा करणे आणि त्यासंदर्भातील काळाबाजार कायमस्वरुपी बंद व्हावा या हेतून शासनाने अंमलबजावणी यंत्रणा अधिक बळकट केली आहे. देशातील प्रत्येक ग्राहकाला स्वयंपाकाच्या इंधनाचा सुरळीत पुरवठा करण्यासाठी शासन कठीबद्ध आहे.

काशिनाथ आगे यांचे निधन

सोयगाव,दि.१५ एप्रिल | येथील काशिनाथ साळुबा आगे(वय.८०) यांचे दि.१५ रोजी मंध्यरात्री १२:३० वाजता निधन झाले.त्यांचेवर सकाळी ११:०० वा.त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,दोन मुली,सुना,नातवंडे असा परिवार आहे.सतीश आगे,भागवत आगे यांचे ते वडील होत

भाजपाचे देशव्यापी नारी शक्ती वंदन अभियान

छत्रपती संभाजीनगर | नारीशक्ती वंदना अभियान हा देशातील लोकसभा राज्य विधानसभा आणि दिल्ली विधानसभेत महिलांसाठी 33 टक्के म्हणजेच एक तृतीयांया जागा राखीव ठेवणारा एक ऐतिहासिक घटनादुरुस्ती कायदा आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये संसदेने मंजूर केलेल्या 'नारी शक्ती वंदन अधिनियम हा देशातील लोकसभा, राज्य विधानसभा आणि दिल्ली विधानसभेत महिलांसाठी ३३ टक्के म्हणजेच कायद्यानुसार त्यात अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमातींच्या जागांचाही समावेश असेल. यामळे महिलांचा राजकारणातील सहभाग आणि प्रतिनिधित्व वाढेल. हा केवळ भारतीय महिलांसाठीच नव्हे, तर संपूर्ण भारतासाठी एक ऐतिहासिक टप्पा आहे. मा. पंतप्रधान नरेंद्र सरकारने

आणलेल्या नारी शक्ती वंदन अभियान राबवण्यात येणार आहे. त्या अंतर्गत १५ आणि १६ एप्रिल रोजी प्रत्येक लोकसभा क्षेत्रात पदयात्रांसह अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहेत. यात अधिकाधिक महिलांनी सहभागी होऊन हे अभियान एक जनआंदोलन व्हावे, असा भाजपाचा प्रयत्न आहे. जागतिक संशोधनातून असे दिसून येते की, अधिक महिला कार्यक्षेत्रात सामील होतात तेव्हा अर्थव्यवस्था वेगाने वाढते. ते उत्पन्न समानता आणि सर्वसमावेशक विकासाला प्रोत्साहन देते. लिंगभेद कमी झाला तर जागतिक अर्थव्यवस्था अंदाजे ७ ट्रिलियन डॉलर्सन वाढू शकते. गेल्या दशकात भारतात अनेक महत्त्वाचे बदल झाले आहेत. ७२ टक्के घरे महिलांच्या नावावर आहेत. पदवीधरांमध्ये ४३ टक्के महिला आहेत. मुद्रा योजनेअंतर्गत मिळणाऱ्या कर्जापैकी ६९ टक्के कर्ज महिलांना दिले जाते. स्टँड-अप इंडियाच्या लाभार्थ्यांपैकी ८४ टक्के महिला आहेत. उज्वला योजना (१० कोटी एलपीजी जोडण्या) जल जीवन मिशन (१४.४५ कोटी घरांना पाणीपुरवठा) स्वच्छ भारत अभियान (उघड्यावर नैसर्गिक विधी करण्यापासून मुक्ती) या शासकीय योजनांनी महिलांचे जीवनमान सुधारले आहे. आर्थिक आणि आरोग्यविषयक सक्षमीकरणात महिला सन्मान बचत प्रमाणपत्र, माता मृत्यूदरात घट, २६ आठवड्यांची प्रसूती रजेचा समावेश आहे. त्यानंतर आता लोकसभेत महिलांची संख्या वाढवणे, पंचायतींमध्ये ४६ टक्के महिलांचे प्रतिनिधित्व हा राजकीय सहभाग अपेक्षित आहे. आज देशातील प्रत्येक निवडणुकीत महिला मोठ्या संख्येने मतदान केंद्रांवर रांगा लावून मतदान करताना दिसतात. अलीकडील निवडणुकांमध्ये अनेक ठिकाणी मतदान करणाऱ्या महिलांची संख्या पुरुषांपेक्षाही जास्त झाली आहे. हा महत्त्वपूर्ण बदल हे दर्शवतो की महिला आता लोकशाहीच्या परिघावर नाहीत तर त्या थेट तिच्या केंद्रस्थानी आहेत. २०२४ मध्ये ६५.७८ टक्के महिलांनी मतदान केले, जे पुरुषांपेक्षा किंचित जास्त आहे. यावरून असे दिसून येते की महिला लोकशाहीत अधिक सक्रिय होत आहेत. पण जेव्हा आपण संसद आणि राज्य विधानसभांकडे पाहतो तेव्हा तिथे महिलांची संख्या कमीच राहते. लोकसभेत १९५२ साली २२ महिला होत्या, ही संख्या २०२४ मध्ये ७५ पर्यंत वाढली आहे. राज्यसभेतही महिलांचा सहभाग सुमारे १७ टक्के आहे. ही एक प्रगती असली तरीही ती आदर्श स्थितीपासून खूप दूर आहे. ग्रामीण भागामध्ये आपण पाहिले आहे की महिलांना संधी दिली जाते, तेव्हा त्या चांगली कामगिरी करतात. आज, पंचायती राज संस्थांमध्ये अंदाजे १४.५ लाख महिला निवडून आल्या आहेत. ते एकूण प्रमाण प्रतिनिधींच्या सुमारे ४६ टक्के आहे. या गावांमध्ये सुधारित पाणीपुरवठा, शाळांचे नूतनीकरण आणि स्वच्छता, पोषण व आरोग्याकडे वाढलेले लक्ष, असे छोटे पण महत्त्वपूर्ण बदल घडून येत आहेत.

पतीला वाचवण्यासाठी रीतचा राघवपासून दूर जाण्याचा निर्णय

छत्रपती संभाजीनगर -झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका जाने अनजाने हम मिले मध्ये सध्या रीत आणि राघवच्या आयुष्यात किर्तीमुळे मोठे वादळ आले आहे. या कथानकात किर्तीने राघवची सुटका करण्यासाठी एक धक्कादायक अट ठेवली आहे.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी
कन्नड तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.2026/जमा-2/कुळ/कावि

दिनांक 09.04.2026

जाहीर प्रगटन

सर्व ग्रामस्थ मौजे खडकी ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर यांना जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री इसुफ मुसा शेख मौजे खडकी गट क्रमांक 104 मध्ये माझ्या नावाने वारसाने जमीन नावावर आलेली असुन सदर सातबाऱ्याच्या इतर हक्कामध्ये कुळ हक्क समान दोन हफ्ते अशी नोंद असल्याने मला बँकेच कर्ज घेण्यास अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे माझ्या सातबाऱ्यावरील इतर हक्कातील सा.कुळ ही नोंद कमी करावी असा अर्ज सादर केलेला आहे.

करिता ज्या कोणास या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन 07 दिवसाच्या आत या कार्यालयास किंवा ग्राम महसूल अधिकारी सजा मोहरा यांच्या कार्यालयात किंवा तहसिल कार्यालय कन्नड येथे लेखी आक्षेप दाखल करावे मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

तहसिलदार कन्नड

लोककलावंतांना जनजागृतीपर कार्यक्रम देण्याची मागणी

ज्येष्ठ कलावंत मदन मिमरोट यांची पालकमंत्र्यांना निवेदन

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी | मागील चार ते पाच वर्षांपासून राज्य शासनाची लोक कलावंतांवर नाराजी असल्याचे दिसून येत आहे. माहिती संचालनालय, मुंबईच्या वतीने जिल्हा माहिती कार्यालय यांच्या मार्फत महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात कलावंत निवडून त्यांना जनजागृतीचे काम देण्यात येत होते. त्यामुळे कलावंतांचा चरितार्थ चालायचा तसेच लोककलाही टिकून राहण्यास मदत होत होती. परंतु, मागील चार-पाच वर्षात जिल्हानिहाय कला संघ निवड चाचणी बंद करण्यात आली असून, शासनामार्फत निघणारे जनजागृतीचे काम हे खासगी एजन्सी मार्फत राबविण्यात येत आहे. त्यामुळे लोककलावंतांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. "माझं गाव आरोग्य संपन्न गाव" या अभियानांतर्गत लोककलावंत तथा पथनाट्य कलावंतांना जनजागृतीचे कार्यक्रम देण्याबाबतचे निवेदन ज्येष्ठ लोककलावंत मदन मिमरोट सह स्थानिक लोककलावंतांनी सामाजिक शासनाबरोबरच केंद्र शासनाच्या गीत व नाटक विभागाकडून मिळणारे कार्यक्रमही बंद झालेले आहेत. ते पूर्वीप्रमाणे सुरू करण्यात यावेत म्हणून गेल्या पाच वर्षांपासून लोककलावंत दिल्ली दरबारी खेट्या मारत आहेत. लोककलावंतांवर उपासमारीची वेळ आली आहे. परंतु, त्यांची कोणी दखल घेत नाही, असे ज्येष्ठ लोककलावंत मदन मिमरोट यांनी सांगितले.

कलावंत नष्ट होण्याची भीती | सदरील कार्यक्रम हे एक वर्ष चालणार असून, त्यासाठी लोककलावंतांमार्फतच, कलापथकांमार्फत जनजागृती करण्यात यावी किंवा एजन्सीला कार्यक्रम देणे अनिवार्य असेल तर त्यांना नोंदणीकृत जे कला संच आहेत, त्यांनाच योग्य अशा मानधन रकमेवर एजन्सी मार्फत काम देण्यात यावे, अशी आमची मागणी असल्याचे लोककलावंतांनी सांगितले. त्यामुळे लोक कलावंतांचा सन्मानही होईल व त्याच्याबरोबर इतर कलावंतांचा परिवार ही जगेल,

जाहीर प्रगटन / सायटेशन नोटीस

मा. श्री. एम. ए. शेख, २ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर

सिव्हील एम.ए. क्रं. २४४/२०२६

अर्जदार :-अजमत नसरूल्लाखा पठाण वय ७८ वर्षे, धंदा घरकाम रा. वाळूज (बु.), ता. गंगापूर जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आफताब एस. शेख रा. गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार ही वरील नमुद ठिकाणची कायमस्वरूपी राहणारी आहे. अर्जदाराची आई नामे अजीमबी अब्दुल शेख दिनांक ०१/०१/१९८७ रोजी मौजे वाळूज (बु.), ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेली आहे. तसेच अर्जदाराचे वडील नामे अब्दुल शेख हे बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले आहे. त्यामुळे मयत अजीमबी अब्दुल शेख यांना अर्जदार ही विवाहीत मुलगी असून अर्जदाराच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही मुलगी किंवा मुलगा नसून अर्जदार हीच मयत अजीमबी अब्दुल शेख यांची कायदेशीर वारसदार आहे. मयत भानुदास केशव जगताप यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक १५/०४/२०२६ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

जाहीर प्रगटन / सायटेशन नोटीस

मा. श्री. एम. ए. शेख, २ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर

सिव्हील एम.ए. क्र. २४१/२०२६

अर्जदार :- १) फरहत भ्र. मेहराजोद्दीन काझी वय ५५ वर्षे, धंदा घरकाम रा. घर क्र.९-३-६१ , शरीफ कॉलनी, रोशन गेट, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद २) फारूकी लैलुन्निहार भ्र. अनिस ऊल हक वय ५० वर्षे, धंदा घरकाम रा. घर क्र. ६-२-९७, मोहल्ला सय्यदन, होली इतवारा जवळ, नांदेड, ता. जि. नांदेड ३) अलीमोद्दीन इफ्तेखारूद्दीन काझी वय ४८ वर्षे, धंदा मजूरी रा. घर क्र.२०६, पटेल नगर, खान चॉल, मोरोळी बाजार, ता. जलालपूर, जि. नवसारी (गुजरात) ४) काजी मसिउद्दीन इफ्तेखारउद्दीन वय ४५ वर्षे, धंदा मजूरी रा. फ्लॅट नं. ०४, खास गेट समोर, नागसेन कॉलनी, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद ५) अमीनुद्दीन इफ्तेकारूद्दीन काजी वय ४२ वर्षे, धंदा मजूरी रा. नासेर कॉटेज, गल्ली नं. १, करीम कॉलनी, रोशन गेट, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :-बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आफताब एस. शेख रा. गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ५ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्र. १ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ विवाहीत बहिणी आहे. अर्जदार क्र. १ ते ५ यांचे वडील नामे इफ्तेखारउद्दीन जमालुद्दीन काझी दिनांक २३/०७/२०२४ रोजी मौजे गंगापूर, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ ते५ यांची आई नामे मलेका बेगम इफ्तेखारउद्दीन काझी दिनांक १५/०८/२०१८ रोजी मौजे गंगापूर, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ५ यांचे आजोबा नामे काझी जमालोद्दीन वजीरोद्दीन फारोकी दिनांक १०/०३/१९९४ रोजी मौजे गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ ते ५ यांची आजी नामे मुत्रवरी बेगम जमालुद्दीन काझी या देखील बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेली आहे. त्यामुळे मयत काझी जमालोद्दीन वजीरोद्दीन फारोकी यांना अर्जदार क्र. १ व २ विवाहीत नात व अर्जदार क्रं. ३ ते ५ नातू या नात्याने कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत काझी जमालोद्दीन वजीरोहीन फारोकी यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल करीता जाहीर प्रगटन, आज दिनांक १५/०४/२०२६ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

सिव्हिल एम.ए. क्र. २४३/२०२६

अर्जदार :-१) पदमाबाई भ्र. भाऊसाहेब गावंडे वय ५७ वर्षे, धंदा शेती, रा. मांगेगाव ता. गंगापुर रा. मांगेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ह.मु.जुनी एसआरपीएफ लाईन, गेट नं.३ जालना ता. जि. जालना २) अशोक भाऊसाहेब गावंडे वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. मांगेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) दादासाहेब भाऊसाहेब गावंडे वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. मांगेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ह. मु. जुनी एसआरपीएफ लाईन, गेट नं.३. जालना ता. जि. जालना ४) कृष्णा भाऊसाहेब गावंडे वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. मांगेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार. :- निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ श्री. रविराज वी दारूंटे यांचे मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार क्र.२ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.१ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे भाऊसाहेब तुकाराम गावंडे हे मौजे मांगेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते दिनांक १२/०३/२०२४ रोजी मौजे मांगेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत भाऊसाहेब तुकाराम गावंडे यांना अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयत भाऊसाहेब तुकाराम गावंडे यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्युपश्चात शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने मा. न्यायालयात सदरचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी